# THE GANPATI FESTIVAL.

By Rev. Baba Padmanji



## गणेशचतुर्थी.

हा सण भाद्रपद मासांत येतो, परंतु त्याच्या पूर्वी महिन्या दीड महिन्यापासून गणपती करण्याचें काम गांवांत चालू असतें. कित्येक लोकांचा हा धंदाच होऊन बसला आहे. चांगली चिकणमाती घेऊन तींत कापूस वगैरे घालून कुटावी व बाजारांत विकण्याकरितां गणपती करावे. या धंद्यावर दर वर्षी पांच पन्नास पासून शंभर दोनशें रुपये एक एक

कारागीर मिळवितो. गणपती घरीं आणिल्यावर त्याच्यावर टीका होऊं लागतात. कोणी ह्मणतो, ह्या गणपतीचें ध्यान चांगलें साधलें. कोणी ह्मणतो, आसनाचा आव फार चांगला झाला, पण अंमळ सोंड बिनसली. अणखी एकजण ह्मणतो, ह्या गणोबाचें पोट तर खपाट्यास गेलें. दुसऱ्या गणपतीला पाहून ह्मणतो याचें दोंद भलें मोठें झालें. आतां याच्या यजमानास काय कमी आहे? याप्रमाणें त्या बापड्या देवावर टीका चालतात, व त्या तो मुकाट्यानें ऐकत बसतो. त्याच्या पूजेस आरंभ होण्यापूर्वीं त्याला बराच वेळ एकीकडे बसावें लागतें, कारण यजमान व घरचीं माणसें त्याच्यासाठीं आरास करण्यांत गुंतलेलीं असतात. पूजेच्या आरंभीं प्राणप्रतिष्ठा होते, ह्मणजे ब्राम्हण मंत्राच्या योगानें त्याजमध्यें देवत्व आणितात, पण तें आल्याचें लक्षण कांहींच दिसत नाहीं. पूजेच्या आरंभीं इतर देवांस जसें स्नान घालितात तसें यास घालीत नाहींत, कारण जलस्नानानें गणोबाची सर्व कळा जाईल अशी भक्तांस भीति असते. गणपतीच्या पूजेंत विशेष हें आहे कीं त्याला २१ मोदकांचा नैवेद्य लागतो. त्याला लाडवांची मोठी आ-

षड आहे. तुकारामानींही याविषयीं ह्मटलें आहे कीं,

**गणोबा विक्राळ । लाडू मोदकांचा काळ ॥**

गणपतीस मेवामिठाईची इतकी गोडी होती कीं एकदां त्याचा बाप महादेव याजवर कोणी वैरी चढाई करून येत असतां त्यास निवारायास बापानें ह्या आपल्या पुत्रास पाठविलें, परंतु त्या शत्रूनें याच्या पुढें मिठाईची रास ठेविली, तिला तो इतका लुब्ध झाला कीं, शत्रु बापावर चढाई करून केव्हां गेला हेंही त्याला समजलें नाहीं, व तेव्हांपासून त्याचें जें दोंद वाढलें, तें अद्याप झडलें नाहीं !

गणपतीपुढें भजन, कीर्त्तन, पुराण चालतें इतकेंच नाहीं, तर कळवंतिणींचा नाच, रांडांच्या बैठका, जुगार, सोंगड्यांचे खेळ, असेही प्रकार चालतात. मुंबईंत गणपतीच्या नव्या नव्या तऱ्हा निघतात, त्यांत आह्मी एकदां अशी एक तऱ्हा पाहिली कीं, गणपतीच्या हातांत बाटली दिली होती, तेव्हां भक्तही बाटलींतील तीर्थ लंबोदराचा प्रसाद मानून प्राशन करीत असतील हें उघडच आहे.

गणपतीची उत्पत्ति सर्वांस ठाऊकच आहे. तो

पार्वतीच्या अंगाच्या मळीपासून झाला, व तिचें द्वार रक्षीत असतां शिवानें बाहेरून येऊन तो आपणाला आंत जाऊं देईना ह्मणून त्याचा शिरच्छेद केला; पुढें पार्वतीनें त्याजकरितां शोक केला ह्मणून हत्तीचें मस्तक आणून त्याला लाविलें. ह्यावरून त्याला गजानन असें नांव पडलें व तें तुह्मी त्यास भूषणप्रद मानून त्याचें दर्शन घेतेवेळीं "हे गजानना" असें ह्मणतां, परंतु वैष्णवपंथी यावरून त्याला "नरपशु" म्हणतात. विचारसागर नामक गुजराथी ग्रंथांत शिवाचें वर्णन करितांना असें म्हटलें आहे कीं—

**"तेनो पुत्र गणेशजी तेवो।**
**रूप विलक्षण नरपशु जेवो ॥"**

वाचकहो, ज्याला तुह्मी देव मानितां त्याच्या उत्पत्तीची कायहो ही कथा! तो तुमच्या कोणत्या कार्यासाठीं ह्मणून अशा प्रकारें उत्पन्न झाला? अशा कथेवर तुमचा विश्वास तरी कसा बसतो? जर पार्वतीला आपल्या अंगाच्या मळीचा सजीव पुतळा करितां आला, तर शिवानें त्याचें मस्तक छेदल्यावर पुनः तें निर्माण करायास तिला शक्ति नव्हती काय? अथवा शिवालाही तसें करण्याचें सामर्थ्य नव्हतें काय? तसेंच

त्याच्या एका दांताविषयींची गोष्ट पाहा. शिव पार्वती एकांतीं असतां त्यांनीं गणोबाला द्वार रक्षणार्थ ठेविलें होतें, इतक्यांत परशरामाची स्वारी शिवदर्शनास आली व त्याला गणपतीनें आंत जाण्याचा प्रतिबंध केला, ह्मणून परशरामानें बुकी मारून त्याचा एक दांत पाडला. अहो, ज्याला तुह्मी विनायक व विघ्नहर्त्ता ह्मणतां त्याला आपणावर आलेलीं हीं दोन विघ्नें निवारण करितां आलीं नाहींत, तो तुमचीं विघ्नें कशीं दूर करील? मित्रहो, विचार करा.

गणेशचतुर्थीच्या दिवशीं तह्मी चंद्रदर्शन घेत नाहीं, कारण तसें केल्यानें तुह्मावर चोरीचा आळ येईल असा चंद्रास गणपतीचा श्राप आहे असें तुह्मी ह्मणतां, पण असें पाहा कीं, तुमच्याशिवाय शेंकडों व हजारों लोक त्या दिवशीं चंद्राला पाहतात त्यांजवर कधीं असा आळ येत नाहीं. तेव्हां ही गोष्ट कशी खरी मानावी?

गणपतीला कांहीं दिवस घरांत ठेविल्यावर तुह्मी त्याला बाहेर नेऊन पाण्यांत टाकतां, हें एक त्या विघ्नहर्त्यावर विघ्नच नव्हे काय? आणि तुह्माला त्याची गरज नाहीं काय? गणपती बुडाल्यावर तुमचीं विघ्नें कोण हरण करील? हा पोरखेळ नव्हे काय? बाव्हला

बाहुलींचा खेळ झाल्यावर मुलें जशीं त्यांस ढकलून देऊन हुर्यो ! करितात तसें तुह्मीं मोरया ! ह्मणून त्याला पाण्यांत टाकितां कीं नाहीं ? इतका पैसा खर्चावा, नाच तमाशे करावे, वेळ दवडावा, जागरणें करावीं, प्रकृति बिघडून घ्यावी व शेवटीं गणोबाला त्याचा कांहीं अपराध नसतां सन्याशाप्रमाणें जलसमाध द्यावी हें न्यायदृष्ट्या तरी योग्य आहे काय ?

गणपतीला हिंदु लोक विद्येचा देव समजतात, परंतु त्याच्या विद्येचें उदाहरण एकही त्याच्या चरित्रांत दृष्टीस पडत नाहीं. त्यानें कोणती विद्या शिकविली ? त्यानें नास्तिक-मत (बौद्ध मत) शिकविलें अशी कथा पुराणांतरीं आहे. तसेंच सर्व मंगल कार्यांच्या आरंभीं त्याचें पूजन करितात, व ग्रंथारंभीं त्याचें नमन लिहितात, परंतु ह्या दोन्ही चाली जुन्या वैदिक कालांत व वैदिक ग्रंथांत कोठें आढळत नाहींत. ऋग्वेदाच्या आरंभीं श्रीगणेशायनमः नाहीं व वेदांत, सांख्य, योग इ० शास्त्रांच्याही आरंभीं नाहीं.

पण हा सर्वच प्रकार अथपासून इतिपर्यंत व्यर्थ आहे, यांत धर्म ह्मणून कांहीं नाहीं. ईश्वरानें असें करण्याविषयीं मनुष्यांस कोठें आज्ञा दिली नाहीं.

तर ईश्वराची इच्छा काय आहे ती जाणा. ती त्याच्या शास्त्रांत प्रगट केली आहे. परमेश्वराची भक्ति आत्म्यानें व सत्यतेनें केली पाहिजे, कारण परमेश्वर निराकार परमात्मा आहे, व तो सत्य आहे. मनुष्यें पापी आहेत. त्यांच्या पापांची क्षमा झाली पाहिजे, त्याशिवाय परमेश्वर त्यांस जवळ घेणार नाहीं. याकरितां त्यानें आपला एकुलता पुत्र प्रभु येशु ख्रीस्त जगांत पाठविला. त्यानें आह्मांकरितां प्रायश्चित्त केलें. जे त्याजवर विश्वास ठेवितात त्यांचीं महाविघ्नें दूर होतात. तीं विघ्नें पाप व पापाचा दंड ह्मणजे अक्षय नरकवास हीं आहेत. येशूच्या पुण्यानें पापाची क्षमा मिळते, व नरकवास चुकतो; मरणाचें भय दूर होतें. येशूवर विश्वास ठेवणारास देवाचा पवित्र आत्मा मिळतो, तो आत्मा आमचें मळीण अंतःकरण शुद्ध करितो, आह्मांस पवित्र आचरण करायास शक्ति देतो. हेंच तारण आहे. प्रिय मित्रहो, ह्या गोष्टीचा विचार करा. ख्रिस्ती शास्त्र वाचून पाहा. प्रभु येशूचे गुण, सामर्थ्य, कर्मे, दया व प्रीति यांचा अनुभव घ्या. त्याचा उपदेश ऐका. "त्याजमध्यें ज्ञानाचे व बुद्धीचे अवघे संग्रह आहेत." (कल. २: ३)

तोच "मार्ग, सत्य व जीवन" आहे. (यो० १४: ६)

"जो वुद्धिमान तो हे अर्थ ध्यानांत धरील, आणि परमेश्वराची परम दया समजेल." (गी० १७:४३)

"जर कोणी ज्ञानाविषयीं उणा आहे तर देव जो सर्वांस उदारपणें देतो त्यापाशीं त्यानें मागावें ह्मणजे त्याला मिळेल." (याको. १: ५)

"हे परमेश्वरा, उत्तम वुद्धि व ज्ञान मला शिकीव." (गीत ११९: ६६)

"अहो कष्टकरी व ओझ्यानें लादलेले, तुह्मी सर्व माझ्याजवळ या, ह्मणजे मी तुह्माला विसांवा देईन. तुह्मी आपणावर माझें जूं घ्या व मजपासून शिका, म्हणजे तुम्ही आपल्या जिवांस विसांवा पावाल."

मित्रहो, ह्या ईश्वरी शास्त्रवचनांचें मनन करा. आणि ह्यांत शेवटीं जें तुम्हांस प्रभु येशूचें आमंत्रण आहे तें घ्या, व त्याजपाशीं या. त्यापासून तुम्हाला ईश्वरी ज्ञान प्राप्त होईल व शांतिहि पावाल.

---

Bombay Tract and Book Society.
Marathi Gratuitous Series. 1st. Edition.
10,000 Copies. A. D. 1885.

Printed at the A. V. Press, Two Tanks, Bombay.